195

महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,
महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.

---

**विषय:-** मोटार वाहन विभागातील परिवहन कार्यालयातील कार्यालयांतील ई-गव्हर्नन्स प्रणालीच्या कार्यालयीन कामकाजासाठी आणि संगणकीकरणासाठी संगणक संच, प्रिंटर व लॅपटॉप GeM पोर्टलवरुन खरेदी करणेबाबत..

## कार्यालयीन आदेश

**का.आ.क्र. ०६ /पआका/संगणक/का.११/संगणक संच व प्रिंटर खरेदी /२०२३-२४/जा.क्र.** 1399 **दिनांक** 31 JAN 2024

मोटार वाहन विभागातील परिवहन आयुक्त कार्यालय व ५० क्षेत्रीय परिवहन कार्यालयात ई-गर्व्हनन्स प्रणालीच्या कार्यालयीन कामकाजासाठी आणि संगणकीकरणासाठी सन २०२३-२४ या वित्तिय वर्षामध्ये संगणक संच, मल्टीफंक्शन प्रिंटर व लॅपटॉप खरेदी माहिती तंत्रज्ञान विभागाने विहित केलेल्या विनिर्देशानुसार (Specification) व उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ सोबतच्या सुधारित नियम पुस्तिकेतील मार्गदर्शक सूचना नियम ४.२ अन्वये दरपत्रक प्रक्रियेव्दारे GeM Portal वरुन करणे प्रस्तावित आहे. प्रस्तुत खरेदी GeM Portal वर उपलब्ध असलेल्या वैशिष्टयांसह (Specification) करण्यास शासनाने शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र. एमव्हीडी-१२२३/प्र.क्र.४१९/परि-४ दि.३०.०१.२०२४ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.

सबब, प्राप्त शासन मान्यतेनुसार GeM Portal वर उपलब्ध असलेल्या वैशिष्ट्यासह (Specification) खरेदी करण्यात येणाऱ्या संगणक संच, प्रिंटर व लॅपटॉपची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| Product | Rate per unit | Qty - TCO | Qty - RTOs | Total Qty | Total Rate |
|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E = C+D | F = E x B |
| Desktop (intel i5 Processor) | 55,000/- | 30 | 370 | 400 | 2,20,00,000/- |
| MFM Printer + Scanner | 25,000/- | 22 | 124 | 146 | 36,50,000/- |
| Laptop intel ( i5 Processor) | 80,000/- | 10 | - | 10 | 8,00,000/- |

तक्त्यातील वर नमूद केलेल्या वस्तुंची खरेदी, सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामध्ये **"मागणी क्र. बी-३, लेखाशीर्ष २०४१, वाहनांवरील कर (०१) (०४) कार्यालयीन अभिलेखांचे संगणकीकरण (मोटार वाहन आणि अपघात दावा न्यायाधिकरण), (२०४१ ०२९७), (१३) - कार्यालयीन खर्च "** या लेखाशिर्षातर्गत वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, दिनांक १७.४.२०१५ (सुधारित) मधील वित्तिय नियम हा भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अनु.क्र. २७-अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या पूर्ण अधिकारानुसार प्रदान केल्यानुसार तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक - ०१.१२.२०१६ व दिनांक - २४.०८.२०१७ व दिनांक ०६.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**परिवहन उपायुक्त (संगणक)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**